# प्रेसनोट दि. १२.०३.२०२१

श्री. नितीश निवृत्ती सुतार, वय २८ वर्ष, कनिष्ठ अभियंता पांटबंधारे शाखा ओगलेवाडी मुख्यालय कडेपूर ता. कडेगांव जि.सांगली यांना ४०,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी केले तलाव दुरूस्तीच्या कामचे बील मंजूर करून बीलाची रक्कम तक्रारदार यांचे संस्थेच्या खात्यावर जमा केल्याचे मोबदल्यात तसेच तक्रारदार यांचे पुढील कामामध्ये त्रास न देण्याकरीता टेंभू उपसा सिंचन उप विभाग कडेपूर येथील श्री. सुतार साहेब यांनी बीलाच्या १० टक्के रक्कम लाच म्हणून मागीतली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.१०.०२.२०२१ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १०.०२.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांनी केलेल्या तलाव दुरूस्ती कामाचे बील मंजूर करून चेक जमा केलेचे मोबदल्यात ४९,०००/- रूपये इतकी लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.१२.०३.२०२१ रोजी टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन उप विभाग कडेपूर या ठिकाणी सापळा लावला असता श्री. नितीश निवृत्ती सुतार, वय २८ वर्ष, कनिष्ठ अभियंता पांटबंधारे शाखा ओगलेवाडी मुख्यालय कडेपूर ता. कडेगांव जि.सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री. नितीश निवृत्ती सुतार, वय २८ वर्ष, कनिष्ठ अभियंता पांटबंधारे शाखा ओगलेवाडी मुख्यालय कडेपूर ता. कडेगांव जि.सांगली यांचे विरुध्द कडेगांव पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक,श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार संजय संकपाळ, अविनाश सागर, सलीम मकानदार, सुहेल मुल्ला, भास्कर भोरे, प्रितम चौगुले, सिमा माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in